# ‘ग्रीनझोन ॲग्रोकेम’च्या वतीने ‘बसवंत हनी बी फेस्टिव्हल’चे आयोजन

## ‘मधुयात्रे’चे वारकरी होऊन ‘निसर्गसेवे’चे मानकरी व्हा!

- ‘बसवंत हनी बी फेस्टिव्हल- २०२१’
- कालावधी : दिनांक ११ ते १४ मार्च २०२१
- वेळ : सकाळी १० ते सायंकाळी ६
- स्थळ : बसवंत हनी बी पार्क, मुखेड रोड,
- पिंपळगाव बसवंत, ता. निफाड, जि. नाशिक
- या समारंभासाठी प्रवेश विनामूल्य आहे.




यंत्रसामर्थ्य आणि तंत्रकुशलता यांच्या बळावर निसर्गचक्राची गती अनुकूल करून घेण्याच्या उद्योगात रमलेल्या माणसाला; त्यानंच तयार केलेल्या मायक्रोस्कोपखालीच केवळ दिसू शकणाऱ्या एका सूक्ष्मतम विषाणूनं मेटाकुटीस आणलं. जगभरात प्राणहानी, आरोग्यहानी आणि पर्यायानं वित्तहानीची परिसीमा गाठून या ‘कोरोना’नं त्याला हतबल करून टाकलं. युरोप- अमेरिकेसह अधिक संक्रमित असलेले काही देश वगळता, बव्हंशी आपल्या भारताबरोबरच इतरत्रही परिस्थिती आता हळूहळू पूर्वपदावर येते आहे, ही जमेची बाजू म्हटली पाहिजे.

– या पार्श्वभूमीवर फक्त जैविक प्रेरणांच्या बळावर अल्पकाळाचं का होईना पण स्वयंपूर्ण आणि

## ‘मिलांज द्राक्ष महाराजा’ स्पर्धा आणि भव्य प्रदर्शन

या दरम्यान ‘पूर्वा केमटेक प्रा.लि.’ प्रायोजित प्रतिष्ठाप्राप्त अशी ‘मिलांज द्राक्ष महाराजा’ ही स्पर्धाही होईल. विविध जातींची द्राक्षे व बेदाणा यांचे अतिशय भव्य असे प्रदर्शन हा साऱ्यांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. आकर्षक मांडणीतून प्रारंभी डोळ्यांना आणि नंतर रसाळ स्वादातून रुचीलाही सुखावणारी ही द्राक्षसंपदा इथल्या मधाळ वातावरणाचा गोडवा वाढवणारी असेल. विजेत्या ‘मिलांज द्राक्ष महाराजा’ला रु. ५००१/- च्या पारितोषिकाचा ‘नजराणा’ मिळणार आहे; तसेच काळ्या व हिरव्या द्राक्षांसाठी प्रथम (रु. २००१), द्वितीय (रु. १५०१) आणि तृतीय (रु. १००१) अशी बक्षिसेही दिली जातील. ही स्पर्धा केवळ उत्पादक शेतकऱ्यांसाठी असून व्यापाऱ्यांकरिता नाही. स्पर्धेचा अन्य तपशील विविध माध्यमांद्वारे प्रसारित केलेला आहेच.



परोपकारी जीवन जगणारी मधमाशी अजिंक्य- असामान्य म्हटली पाहिजे. प्रतिकूल परिस्थितीतही तिची पाठराखण (किंवा पंखराखण!) लाभलेल्या आपल्या शेतकऱ्याला शेतात उभं राहायची उमेद देणाऱ्या या 'मधुरागिणी'चा महोत्सव नाशिक जिल्ह्यातल्या पिंपळगाव बसवंतमध्ये साजरा होत आहे. प्रवेशासाठी कोणतेही शुल्क नाही.

मुखेड रोडवरच्या **'बसवंत हनी बी पार्क'**मध्ये पुढील महिन्यात **दि. ११ ते १४ मार्च दरम्यान** दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळात भरगच्च कार्यक्रम- चर्चासत्रांसह हा सोहळा साजरा होईल. **'ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि.'** च्या प्रायोजनाद्वारा होणारा हा **'बसवंत हनी बी फेस्टिवल- २०२१'** अनेक कारणांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे. प्रामुख्याने मधमाशी पालन आणि त्या अनुषंगाने शक्य असणारे विविध निसर्गपूरक व्यवसाय या 'हनी बी फेस्टिव्हल'च्या केंद्रस्थानी आहेत.

या बसवंत गार्डन परिसरात स्वयंपूर्ण ग्रामजीवनाचे मॉडेल ठरावे असे आदर्श गाव सेवरगांव, बेदाणा प्रक्रिया तसेच फळप्रक्रिया उद्योग, जानोरी फ्लॉवर्सचा प्रकल्प अशी हरित- उद्यमसृष्टी असून आकर्षक असे मधमाशी उद्यान उभारलेले आहे. येथे मधमाशी पालन व्यवसायाचे समग्र प्रशिक्षण प्रात्यक्षिकांसह देण्याची सुविधा आहे. विविध कार्यकालांच्या वेळापत्रकानुसार प्राथमिक एक दिवसाच्या प्रशिक्षणापासून तीन व पाच दिवसीय अभ्यासक्रम इच्छुक मधुपालकांना येथे पूर्ण करता येतात. बेरोजगार युवकांना त्याचप्रमाणे मध उत्पादन क्षेत्रात करीअर करू इच्छिणाऱ्यांना चरितार्थाचे उत्तम साधन उपलब्ध व्हावे, हा या उपक्रमाचा हेतू आहे. देशातील इतर राज्यांच्या तुलनेत हा व्यवसाय महाराष्ट्रात पिछाडीवर आहे. आपल्या महाराष्ट्राने या 'जैविक उद्यमशीलते'तही आघाडीवर राहावे, यानिमित्ताने परागीभवन सेवेद्वारे शेतकऱ्यांचे पीक उत्पादन वाढावे, असा समाजाभिमुख दृष्टिकोन या नियोजनामागे आहे.

दोन वर्षांपूर्वी मधुमक्षिका पालन क्षेत्रात प्रशिक्षण, प्रत्यक्ष व्यवसाय आणि विस्तारकार्य करणाऱ्या मान्यवरांच्या उपस्थितीत 'मधुक्रांती- २०१९' हा मेगा इव्हेन्ट येथे उपस्थितांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने पार पडला. गतवर्षीचा म्हणजे २०२० चा 'मधुक्रांती' परिसंवाद 'कोरोना' संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर 'वेब- चर्चासत्रा'च्या स्वरुपात झाला. या ऑनलाईन परिसंवादातही विपुल विचारमंथन झाले. आता होणारा 'बसवंत हनी बी फेस्टिवल- २०२१' ही या पूर्वोक्रमांची फलश्रुती असून, या नियोजनातले एक प्रकारे पुढचे पाऊल आहे.

**गतवर्षीचा (२०२०) 'मधुक्रांती परिसंवाद' वेब- चर्चासत्राच्या स्वरुपात ऑनलाईन झाल्याने, समक्ष उपस्थिती अर्थातच शक्य नव्हती. यास्तव त्यावर्षीच्या 'मधुक्रांती पुरस्कारां'च्या मानकऱ्यांचा गौरव सोहळाही या कार्यक्रमात होणार आहे.**

**'पूर्वा केमटेक प्रा.लि.'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार** यांनी कृषिनिविष्ठा व्यवसायात स्थिरावल्यानंतर, 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'च्या माध्यमातून द्राक्षविक्री, बेदाणा व फळप्रक्रिया व्यवसायाची मुहूर्तमेढ रोवली. 'बसवंत' हा ब्रँड नावारुपाला आणला. आता एक सुनियोजित उद्योग या नात्याने काहीशा दुर्लक्षित; मात्र सर्व सजीवांच्या जीवनधारणेत अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या मधमाशी पालन व्यवसाय प्रशिक्षणात तसेच त्या अनुषंगाने मधप्रक्रिया, विक्री, शेतकऱ्यांसाठी परागीभवन सेवा अशा क्षेत्रांत त्यांनी यशस्वीपणे पदार्पण केले आहे.

या प्रदर्शनात मधमाशीच्या संदर्भातील विविध वस्तू- साधनसामग्री, मधप्रक्रिया, मधपेट्यांची मांडणी- रचना, विविध वनस्पतींच्या फुलोऱ्यातील मधाचे वैविध्यपूर्ण नमुने बघायला मिळतील. त्या बरोबरच या क्षेत्रातील यशवंत मधपाळांचे, तज्ज्ञांचे विचार विविध व्याख्यानांमधून ऐकावयास मिळतील. या 'मधुयात्रे'त सर्वांनी जरुर सहभागी व्हावे, यासाठी विनम्र आवाहन. **(सौजन्य: 'पूर्वा कृषिदूत' परिवार)** ■